# संत भक्तराज महाराज यांचे चरित्र : खंड २
# संत भक्तराज महाराज
# यांचे गुरुरूप आणि सहजावस्था

## अनुक्रमणिका

**( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ( मुद्दे ) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )**


– मनोगत ५

– ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य ७

**प्रकरण १**

**सद्‌गुरु भक्तराज : बाबांचे गुरुरूप**

१. गुरूंनी गुरुपदावर बसवणे ११

२. गुरुपदावर आरूढ झाल्यावर बाबांचे विचार १३

३. उत्तम गुरु १३

३ अ. होकारात्मक शिकवण १५

३ आ. शिष्य नामस्मरण करतो कि नाही, याकडे लक्ष १५

३ इ. शिष्याकडून नामस्मरण करवून घेणे १५

३ ई. शिष्याकडून साधना करवून घेण्याची क्षमता १५

३ उ. शिष्याला निश्चिती देणे १६

३ ऊ. निश्चितीदायी दृष्टीकोन ३ ए. शिकवण्याची पद्धत १६

४. बाबा आणि गुरुमंत्र १८

४ अ. गुरुमंत्राविषयी अपसमज (गैरसमज) १८

४ आ. एखाद्या शिष्याला गुरुमंत्र न देणे ! १९

४ इ. खरा गुरुमंत्र २०

४ ई. बाबांनी दिलेल्या गुरुमंत्राचे सामर्थ्य २०

| | |
|---|---|
| ४ उ. गुरुमंत्र एकाच गुरुतत्त्वाकडून मिळणे | २० |
| ४ ऊ. गुरुमंत्रातील शब्द | २० |
| ४ ए. गुरुमंत्र द्यायचा विधी | २० |
| ४ ऐ. गुरुमंत्र कोठे जपावा ? | २१ |
| ५. शिष्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन | २१ |
| ६. शिष्याचे संपूर्ण दायित्व घेणे | २२ |
| ६ अ. शिष्याची लौकिक दृष्टीने काळजी घेणे | २२ |
| ६ आ. शिष्यांना आर्थिक साहाय्य करणे | २४ |
| ६ इ. शिष्याला आपली आठवण करून देणे | २६ |
| ६ ई. शिष्याला पूर्वसूचना देणे | २६ |
| ६ उ. शिष्यासाठी प्राण धोक्यात घालणे | २६ |
| ६ ऊ. शिष्याशी एकरूपता | २७ |
| ६ ए. शिष्यांची रुग्णाईत स्थिती (आजारपण) आणि मृत्यू | २७ |
| ७. शिष्याने बाबांकडे कधी जायचे, हेही बाबांनी ठरवणे | २९ |
| ८. शिष्याला गुरूंची सर्वशक्तीमानता दाखवून देणे | २९ |
| ९. शिष्यांची श्रद्धा वाढवणारे वागणे | २९ |
| १०. शिष्याची परीक्षा घेणे आणि टप्प्याटप्प्याने श्रद्धा वाढवणे | ३० |
| ११. आशीर्वाद देतांना बाबांचा भाव | ३० |
| १२. शिष्यांनी बाबांशी कसे वागावे ? | ३० |
| १३. शिष्यांची प्रगती | ३२ |
| १४. शिष्यसंख्या | ३३ |
| १५. शिष्यांनी बाबांपासून दूर जाणे | ३३ |
| १६. स्वतःच्या गुरुपदाविषयी बाबांचे विचार | ३४ |

## प्रकरण २

## बाबांची प्रमुख वैशिष्ट्ये


१. स्थूलातील वैशिष्ट्ये ३७

२. स्वभाववैशिष्ट्ये ३९

२ अ. संत होण्यापूर्वीपासून असलेली प्रमुख स्वभाववैशिष्ट्ये ३९

* शिव्या देणारा ३९

* रागीट * खर्चिक ३९

* खवय्या ४६

* उत्कृष्ट स्वयंपाकी ४६

* वाक्चतुर ४६

* हाडाचा व्यापारी ४७

२ आ. संत झाल्यावर निर्माण झालेली स्वभाववैशिष्ट्ये ४८

* काटकसरी ४९

* प्रतिकूल आर्थिक स्थितीतही आनंदी राहणारा ५०

* सर्व उत्कृष्ट करणारा ६८

* प्रीती * प्रसिद्धीपराङ्मुख ७०

* गुरूंची सतत आठवण असणारा ७४

* शिष्याच्या श्रद्धेनुसार वागणारा ७४

* बंधनातीत ७५

* ईश्वरेच्छेने वागणारा ७५

* स्थितप्रज्ञ ७६

* सहजावस्था ७६

* जीवात्मादशा ते शिवदशा ७७

## प्रकरण ३
## बाबांचे बोलणे


| | |
|---|---|
| १. अखंड | ७९ |
| २. एकतर्फी | ७९ |
| ३. सहजता | ७९ |
| ४. वाक्‌चातुर्य | ७९ |
| ५. विनोदी | ८० |
| ६. व्यावहारिक प्रश्न आणि बाबा | ८० |
| ७. संदिग्ध | ८१ |
| ८. व्यक्तीनुसार बोलणे | ८१ |
| ९. अध्यात्मविषयक | ८२ |
| १०. बाबांनी लावलेले शब्दांचे अर्थ | ८२ |
| ११. बोलणे न समजणे | ८३ |
| १२. स्वतःच्या बोलण्याविषयी बाबांचे विचार | ८४ |
| १३. बाबा बोलत असतांना ऐकणाऱ्यांना येणारे अनुभव अन् अनुभूती | ८४ |
| १४. बाबांनी हाक मारल्यावर बेशुद्ध भक्त शुद्धीवर येणे | ८५ |


## प्रकरण ४
## बाबांचे वागणे


| | |
|---|---|
| १. जीवदशा | ८७ |
| २. घरापेक्षा निसर्ग प्रिय | ८७ |
| ३. आजार | ८७ |
| ४. लहान मुले | ८९ |
| ५. भक्तांच्या घरी | ८९ |
| ५ अ. घरी जाणे | ८९ |
| ५ आ. घरी जेवणे | ९० |
| ५ इ. घर पाहणे | ९० |

५ ई. घरी राहणे ९०
५ उ. घरच्यांची असुविधा होऊ न देणे ९०
६. दुसऱ्यांची सोय पाहणे ९०
७. भोजन ९१
८. भजन ९१
९. भंडारा ९३
१०. भ्रमण ९३
११. तीर्थयात्रा ९६
१२. छायाचित्र (फोटो) आणि बाबा ९६
१३. आर्थिक टंचाईवर तात्कालिक मात करणाच्या बाबांच्या युक्त्या ९७
१४. संत म्हणून वागणे ९७
१५. सिद्धी ९९
१६. विरोधकांशी वागणे १००
१७. इतरांविषयीचा भाव १००
१८. स्वतःच्या चरणांचे तीर्थ घेणे १०१
१९. स्वतःच्या वागण्याविषयी बाबांचे विचार १०१

## प्रकरण ५
## भंडारे, उत्सव आणि गुरुपौर्णिमा

१. भंडारे १०३
१ अ. बाबांचे स्वयंपाकघर – प्रतिदिनचा भंडारा ! १०३
१ आ. इतिहास १०४
१ आ १. अनंत चतुर्दशी १०४
१ आ २. प.पू. श्री अनंतानंद साईश यांचा महानिर्वाणोत्सव १०६
१ आ ३. दिवाळी १०६
१ आ ४. होलिकोत्सव १०७
१ आ ५. तुकाराम बीज १०७
१ आ ६. श्रीरामनवमी १०७

१ आ ७. वसंतपंचमी १०७
१ आ ८. इंदूर येथील उत्सवांची पूर्वसिद्धता १०८
१ इ. भंडाऱ्याचा उद्देश १०८
१ इ १. अन्नदान १०८
१ इ २. सेवा १०८
१ इ ३. त्याग १०८
१ इ ४. दुसऱ्यांविषयी प्रेम वाटणे १०९
१ इ ५. अहंभाव न्यून होणे १०९
१ इ ६. सत्संग १०९
१ ई. पूर्वसिद्धता १०९
१ उ. आदला दिवस १०९
१ ए. भंडाऱ्याचा दिवस ११०
१ ऐ. येणाऱ्यांचे प्रकार ११०
२. वार्षिक उत्सव ११२
३. प.पू. भक्तराज महाराज यांच्या गुरुपौर्णिमा ११३

**प्रकरण ६**

**ग्रंथाच्या संदर्भातील अनुभूती**

१. ग्रंथाचे मुखपृष्ठ सिद्ध करणाऱ्या साधिकेला आलेली अनुभूती ११४
२. ग्रंथाच्या मुखपृष्ठाच्या संदर्भात साधकांना आलेल्या अनुभूती ११५
३. ग्रंथाच्या संदर्भात एका साधिकेला आलेल्या अनुभूती ११७

# मनोगत

## पहिल्या आवृत्तीचे मनोगत

### १. चरित्रलिखाणाचा विचार

आमच्या संस्थेतर्फे 'अध्यात्मशास्त्र' या विषयावरील अभ्यासवर्ग प्रतिमास ठिकठिकाणी घेतले जातात. त्या वर्गांची आणि त्यांना उपस्थित राहणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. संस्थेच्या कार्यामागची प्रेरणा प.पू. भक्तराज महाराज (प.पू. बाबा) यांची असल्याचे आम्ही सर्वांना सांगत असल्याने 'बाबांचे चरित्र वाचायला मिळावे', असे बऱ्याच जिज्ञासूंना वाटत होते. त्यांच्या या मागणीची पूर्तता करण्यासाठी आम्ही बाबांचे चरित्र लिहायचे ठरवले.

### २. बाबांचे पूर्वायुष्य आणि स्थूलातील विषय यांविषयीची माहिती

बाह्यतः सर्वसाधारणपणे असते तसे बालपण, तारुण्य, आर्थिक स्थिती, विवाह इत्यादी असतांना एखादा साधना करून अध्यात्मात सर्वोच्च प्रगती करू शकतो, तर आपणही प्रयत्न करून पाहूया', असा विचार काही जणांच्या मनात येऊन ते साधना करण्याची शक्यता असते. यासाठी या ग्रंथात बाबांचे पूर्वायुष्य लिहिले आहे.

स्थूलातील विषयाला महत्त्व द्यायचे नाही, असे ठरवले, तरी 'या चरित्रात सर्व माहिती आहे, असे निरनिराळ्या पातळीच्या साधकांना वाटून त्यांच्यात विश्वास आणि श्रद्धा निर्माण होऊन ते साधना करतील', असे वाटले. 'बाबांच्या स्थूलदेहाविषयीचा भागही चरित्रात घेणे आवश्यक आहे', असे वाटल्याने तोही घेतला आहे.

### ३. स्वभावदोषांविषयी लिहायचे कि नाही ?

बाबांच्या रागीट, शिव्या देणारा, उधळ्या, उतावळा इत्यादी बाह्यतः वाटणाऱ्या स्वभावदोषांविषयी आपण लिहिले, तर ते योग्य होईल का, इतरांना आपल्या गुरूंविषयी काय वाटेल, आधीच नास्तिक असलेल्या काही जणांना अध्यात्मापासून आणखी दूर लोटायला आपण कारणीभूत तर ठरणार नाही ना, अशा तऱ्हेचा कुठलाच विचार मनात आला नाही. आपण अध्यात्मशास्त्राचे अभ्यासक आहोत. तेव्हा शास्त्रात जे आहे, तसे लिहायचे असते; म्हणून बाह्यतः बरे-वाईट वाटणारे जे काही असेल, ते सर्व लिहायचे, असे ठरवले.

## ४. चरित्रलेखनाविषयीचा आमचा अनुभव

चरित्र लिहून पूर्ण झाल्यावर मागच्या काही प्रसंगांची आठवण झाली. बाबांकडे गेल्यावर आम्ही नेहमी काही प्रश्‍न विचारून बाबांनी दिलेली उत्तरे लिहून घेत असू. बाबांना कोणी विचारले, 'डॉक्टर काय लिहून घेतात ?', तर बाबा उत्तर द्यायचे, 'डॉक्टर माझे चरित्र लिहीत आहेत.' तेव्हा आम्ही तिकडे दुर्लक्ष करायचो. पुढे अनुभवास आले की, बाबा हे तत्त्वरूप असल्याने त्यांचे चरित्र हेही अध्यात्मशास्त्रावरील लिखाणाप्रमाणे आहे. बाबांनी त्यांच्या संकल्पाप्रमाणे ते आमच्याकडून लिहून घेतले ! – **संकलक**

## विभाजित दुसऱ्या खंडाच्या आवृत्तीचे मनोगत

९.२.१९९५ या दिवशी साजऱ्या झालेल्या बाबांच्या अमृतमहोत्सवाच्या प्रसंगी चरित्राची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. अमृतमहोत्सवाची धावपळ संपल्यावर चरित्र वाचून घेतांना बाबांनी काही नवीन माहिती सांगितली, तसेच काही प्रसंगांचे विश्‍लेषणही केले. तो सर्व भाग चरित्रच्या सुधारित आवृत्तीत घ्यायचा होता. बाबांच्या देहत्यागानंतरही त्यांच्याविषयीच्या माहितीची आणखी काही सूत्रे (मुद्दे) त्यांच्या सान्निध्यात राहिलेल्या काही भक्तांकडून मिळत गेली. तीही सूत्रे सुधारित आवृत्तीत घ्यायची होती; पण यामुळे सुधारित आवृत्तीची पृष्ठसंख्या पुष्कळ वाढू शकली असती. 'ग्रंथ नेहमी वाचकांच्या दृष्टीने सुटसुटीत आणि त्यांना परवडतील असे हवेत', असे बाबांनीच पूर्वी सांगितले होते. म्हणून चरित्रचे विषयांनुसार आता पाच खंडांमध्ये विभाजन केले आहे.

प्रस्तुत खंडात बाबांचे गुरुपदाविषयीचे विचार; बाबांच्या शिष्यांना शिकवण्याच्या विविध पद्धती; बाबांची स्वभाववैशिष्ट्ये, बोलणे अन् वागणे; बाबा साजरे करत असलेले भंडारे, उत्सव, गुरुपौर्णिमा इत्यादींविषयी माहिती दिली आहे.

हा ग्रंथ वाचून काही जणांनी तरी साधनेला प्रारंभ करावा, अशी श्रीगुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**